**बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ -**
**एटीएमस मधून निधीचे तृतिय पक्षीय हस्तांतरण**

डीबीओडी.क्र.बीएल.बीसी ५/२२.०१.००१/२००३

जुलै २३, २००३
श्रावण ०१,१९२५ (शके)

**सर्व अनुसूचित व्यावसायिक बँका**
**(आरआरबीज आणि एलएबीज वगळून)**

प्रिय माननीय महोदय,

**बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ -**
**एटीएमस मधून निधीचे तृतिय पक्षीय हस्तांतरण**

ऑटोमेटेड टेलर मशिन्स (एटीएम्स) मध्ये तरतूद केलेल्या कार्यांवरील आमच्या सर्वोच्च परिपत्रक क्र. डीबीओडी.बीएल.बीसी. ५/२२.०१.००१/२००२ दिनांक जुलै १८,२००२ च्या परिच्छेद १२.३ चा संदर्भ घ्यावा ज्यामध्ये असे निर्दिष्ट केलेले आहे कि, आंतरखातीय हस्तांतरणे एकाच ग्राहकाच्या खात्यापुरती एकाच केंद्रावर किंवा वेगवेगळ्या केंद्रावर मर्यादित ठेवावीत.

२. बँकांकडून प्राप्त झालेल्या विनंत्यांच्या आधारे, असे ठरविण्यात आले आहे कि एकाच बँकेच्या एटीएमद्वारे देशांतर्गत एका ग्राहकाच्या खात्यातून दुसऱ्या ग्राह्काच्या खात्यात निधी हस्तांतरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यास बँकाना परवानगी द्यावी. संबंधित मान्यता आणि कागदपत्रे जी एटीएम्सद्वारे अशी प्रदाने करण्यासाठी आधारभूत असतात ती बँक आणि ग्राहक यानी द्विपक्षीय तडजोडीतून ठरवावीत आणि प्रत्येक पक्षाचे हक्क आणि कर्तव्ये मान्यतेत स्पष्टपणे नमूद करावीत आणि कायद्याच्या न्यायालयात वैध असावीत. बँकानी एटीएम्सद्वारे तृतीय पक्षीय प्रदानाना परवानगी देताना आपले दायित्व पार पाडण्यासाठी उचित पावले उचलावीत.

३. त्याशिवाय, बँकाना असाहि सल्ला देण्यात येत आहे कि, आरबीआयने "कंपेंडियम ऑफ बेस्ट प्रॅक्टिसेस इन कॉम्प्युटराइजड एन्व्हायरनमेंट" आणि "वर्किंग ग्रुप ऑन इंटरनेट बँकिंग" वरील अहवालात अधोरेखित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सल्ला दिल्याप्रमाणे सुरक्षा व्यवस्था करावी.
बँकानी आमच्या परिपत्रक डिबीएस.सिओ.आयटीसी.बीसी. १०/३१.०९.००१/ ९७-९८ दिनांक ४ फेब्रुवारी १९९९८ अन्वये मार्गदर्शक टिपचे आणि परिपत्रक डिबीओदी.सीओएमपी.बीसी.क्र.१३०/०७.०३.२३/२०००-०१ च्या मार्गदर्शक तत्त्वांची आणि "तुमचा ग्राहक जाणा" नियमांचिहि पूर्तता करावी.

४. त्यानुसार, एटीएममध्ये तरतूद करता येतील अशा कामांच्या बाबतीतील सर्वोच्च परिपत्रक डीबीओडी.बीएल.बीसी. ५/२२.०१.००१/जुलै १८, २००२, "आंतरखातीय हस्तांतरण- बँकेच्या एकाच ग्राहकाच्या किंवा वेगवेगळ्या ग्राहकांच्या देशांतर्गत एकाच केंद्रावर किंवा वेगवेगळ्या केंद्रांवर" असे सुधारण्यात आले आहे.

आपला विश्वासू
(सी.आर. मुरलीधरन)
मुख्य महाव्यवस्थापक

इएनडीटी.डिबीओडी क्र. बीएल/२२.०१.००१/२००३ दिनांक

विभागीय कार्यालयाना माहिती आणि आवश्यक कृतीसाठी प्रत पाठवली

(आर.सी.मित्तल)
महाव्यवस्थापक